# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०५ जुलै, २०२४ / आषाढ १४, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार मंत्री** | |
| **(२)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | |
| **(३)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(४)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **कृषी मंत्री** | |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

---

### कोयना (जि.सातारा) व उजनी (जि.सोलापूर) येथील प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या शासकीय जमिनींवर हस्तांतरबंदी शेरा मारण्याचे दिलेले आदेश

**(१) * ८२९८९ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीत ३१३ प्रकल्पग्रस्तांना शासकीय जमिनीचे वाटप करण्यात आले व त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील कोयना व सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणग्रस्तांना देखील पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, उत्तर सोलापूर, मोहोळ या तालुक्यांतील शासकीय जमिनी देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जमीन वाटपात गैरव्यवहार झाल्यामुळे महसूल विभागाने सदर जमिनीसंदर्भात हस्तांतरणबंदी शेरा मारण्याचे आदेश दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आदेशामुळे सर्वसामान्य शेतकरी व धरणग्रस्तांचे मोठे नुकसान होत असून त्यांचे लाखो रुपये अडकून पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन हस्तांतरणबंदी संदर्भातील आदेश तात्काळ उठविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील उजनी व सातारा जिल्ह्यातील कोयना, कन्हेर, धोम या प्रकल्पामधील एकूण ७२९ प्रकल्पगस्तांना सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, उत्तर सोलापूर व मोहोळ या तालुक्यांमध्ये दिनांक ०१.०१.२०१५ ते ३१.१२.२०२२ या कालावधीत पर्यायी जमिनींचे वाटप करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) पुनर्वसनअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना सोलापूर जिल्ह्यातील पर्यायी जमिन वाटप प्रकरणातील अनियमिततेबाबत प्राप्त तक्रारीसंदर्भात पूर्वी केलेली कार्यवाही, विभागीय आयुक्त, पुणे यांच्या सूचना तसेच मा.उच्च न्यायालयाचे आदेश या बाबीं विचारात घेवून पर्यायी जमिन वाटप प्रकरणांची तपासणी सुरू आहे. त्यानुषंगाने जुन्या आदेशांनुसार पर्यायी जमिन वाटप केल्याबाबत प्राथमिक तपासणीत निदर्शनास आलेल्या ३१३ प्रकरणी चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित क्षेत्राच्या ७/१२ च्या इतर हक्कामध्ये हस्तांतरण बंदी असा शेरा नमूद करण्याबाबत सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिनांक ०५.०१.२०२४ रोजी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नेरुळ सीवूड्स (नवी मुंबई) येथील डीपीएस तलावाजवळ फ्लेमिंगोंचा झालेला मृत्यू**

**(२) * ८१७४७ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ सीवूड्स (नवी मुंबई) येथील डीपीएस तलावाजवळ पाच फ्लेमिंगो पक्षांचा मृत्यू तर सात फ्लेमिंगो पक्षी जखमी झाल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच याच ठिकाणी चार दिवसापूर्वीच अन्य चार पक्षांचा मृत्यु झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे येथील मानपाडा रुग्णालयात जखमी झालेल्या फ्लेमिंगोंना वाईल्ड लाईफ वेल्फेअर असोसिएशनच्या पथकाने दाखल केले तर वन विभागाने मृत्यू झालेल्या फ्लेमिंगोंचे मृतदेह मुंबई येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत त्या अहवालाचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, सदर घटनांची उच्चस्तरिय चौकशी करण्याबाबतचे निवेदन वाईल्ड लाईफ वेल्फेअर असोशिएशनमार्फत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) कांदळवन कक्षा अंतर्गत वनपरिक्षेत्र, नवी मुंबई हद्दीतील DPS Lake च्या परिसरात दिनांक २५.०४.२०२४ रोजी ६ मृत फ्लेमिंगो व ६ जखमी फ्लेमिंगो आढळून आले होते. त्यापैकी ३ जखमी फ्लेमिंगो पक्ष्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असुन उर्वरित ३ फ्लेमिंगो पक्ष्यांना उपचारानंतर दिनांक ०६.०५.२०२४ रोजी वाईल्ड लाईफ वेल्फेअर असोशिएशन पथकाचे प्रतिनिधी व विभागाचे कर्मचारी यांचे समक्ष मौजे करावे येथील टि एस चाणक्य तलावातील नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले आहे. मात्र अन्य चार पक्ष्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) ६ मृत फ्लेमिंगो पक्ष्यांचे मृतदेह शवविच्छेदनाकरीता मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परेल यांचेकडे पाठविण्यात आले असता ४ पक्ष्यांचा मृत्यू Cardiorespiratory Failure व २ पक्ष्यांचा मृतदेह भग्नावस्थेत असल्यामुळे निश्चित कारण समजू शकले नाही. सदर मृत्यू झालेल्या ६ पक्ष्यांचा व्हिसेरा सहाय्यक संचालक, लघु न्यायसहाय्यक वैद्यकीय प्रयोगशाळा, ठाणे यांचेकडे सादर करण्यात आला असुन सदर अहवाल प्रतिक्षेत आहे.
(४) व (५) सदर प्रकरणी चौकशीकरीता दिनांक २६.०४.२०२४ रोजी कांदळवन कक्षातील क्षेत्रीय अधिकारी, BNHS चे प्रतिनिधी व स्थानिक रहिवासी यांच्या समवेत स्थळपाहणी करण्यात आली तसेच दिनांक ०१.०५.२०२४ रोजी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांनी देखील DPS Lake नेरूळ येथे प्रत्यक्ष भेट दिली असून चौकशी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबीनुसार पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत :-

• DPS Lake शेजारील २ रस्त्यावर असलेले LED दिव्याऐवजी ३० ते ४५ डिग्री बीम अँगलचे लो प्रेशर सोडीअम लाईट / पिवळ्या रंगाचे LED दिवे बसविणे.

• DPS Lake मध्ये नैसर्गिक पाण्याचा प्रवाह सुरळीत होण्याकरीता इनलेटची देखभाल दुरूस्ती करणे.

वरील शिफारशी संदर्भात कार्यवाही करण्याकरीता आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका व सिडको यांना कळविण्यात आले आहे.

तसेच चौकशी दरम्यान DPS Lake मधील पाणी गुलाबी रंगाचे आढळून आल्याने सदर बाब फ्लेमिंगो मृत्युचे कारण होऊ शकते का याची तपासणी करण्याकरीता उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांना विनंती करण्यात आले होती. सदर तपासणी अहवाल घेऊन मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परेल यांच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आला असता फ्लेमिंगोचा मृत्यू पाण्यातील कोणत्या घटकामुळे झाला हे सांगता येत नसल्याचे त्यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्ह्यातील महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र (एमआरसॅक) यांच्या चुकीच्या अहवालामुळे शेकडो केळी उत्पादक विम्याच्या मदतीपासून वंचित असल्याबाबत

**(३) * ८२१३६ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: जळगांव येथे हवामानावर आधारित फळ पिकविमा योजनेत सन २०२२-२३ मध्ये सहभागी झालेल्या अनेक केळी उत्पादकांचे विमा प्रस्ताव महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र (एमआरसॅक) यांच्या अहवालातील माहिती व छायाचित्रे आदींच्या आधारावर विमा कंपनीने नामंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआरसॅक यांच्या अहवालात ज्या भागात केळीची लागवड आहे त्या भागात केळीची लागवड नाहीच किंवा अल्प आहे अशा प्रकारच्या चुकीची माहिती दिल्याने जळगांव जिल्ह्यातील शेकडो केळी विमाधारक मदतीपासून अद्याप वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन चुकीची माहिती देणाऱ्यांवर कारवाई करुन विमाधारक शेतकऱ्यांचे प्रस्ताव मंजूर करुन त्यांना तात्काळ विमा परतावे देण्यात यावेत, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, जळगांव यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक २७.०९.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशांस अनुसरून एमआरसॅक कडून प्राप्त अहवालानुसार आंबिया बहार २०२२-२३ मधील जळगांव जिल्ह्यातील १०,९१९ प्रस्तांवामध्ये केळी पिक आढळून न आल्याने सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जळगांव जिल्ह्यातील केळी पिक आढळून न आल्याने नामंजूर करण्यात आलेल्या १०,९१६ विमा प्रस्तावापैंकी जिल्हाधिकारी जळगाव यांनी ६,६८६ रद्द झालेले शेतकऱ्यांचे प्रस्ताव मान्यतेसाठी पुनश्चः सादर केले आहेत. त्यास अनुसरून भारतीय कृषि विमा कंपनीकडून अहवाल घेतला असता, जिल्हाधिकारी जळगांव यांनी सादर केलेल्या

यादीनुसार जळगांव जिल्ह्यातील ६६८६ शेतकऱ्यांपैकी महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर (MRSAC) यांच्या अहवालानुसार ६६०९ शेतकऱ्यांचे शेतावर केळी पिक आढळून आले नसल्याने त्यांचे प्रस्ताव रद्द करण्यात आलेले आहेत. एकूण ६६८६ शेतकऱ्यांपैकी रद्द झालेले ६६०९ शेतकऱ्यांचे प्रस्ताव वगळून उर्वरित ७७ शेतकऱ्यांपैकी २९ शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव पात्र आढळून आल्याने सदरचे प्रकरण मंजूर करून नुकसान भरपाई अदा केलेली आहे. तर उर्वरित ४७ शेतकऱ्यांचे केळी पिकाखालील क्षेत्राची प्रत्यक्ष तपासणी केली असता, शेतकऱ्यांनी विमा प्रस्तावात, प्रस्तावित केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र आढळून आले असल्याने प्रत्यक्षात आढळून आलेल्या क्षेत्रानुसार नुकसान भरपाई मंजूर करण्यात आलेली असून सदर शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची रक्कम वाटप कंपनीस्तरावर सुरू आहे. एका विमा धारकाचा विमा पॉलिसीचा क्रमांक चुकीचा नमूद केला असल्याने त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पटसंख्या कमी असणाऱ्या आश्रमशाळा बंद करुन विद्यार्थ्यांचे इतरत्र समायोजन करण्याचा आदिवासी विकास विभागामार्फत घेतलेला निर्णय

**(४) * ७९९७४ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागामार्फत कार्यान्वित असलेल्या शासकीय माध्यमिक आश्रमशाळांमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवासी शिक्षण देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास आयुक्तालयामार्फत पटसंख्या कमी असणाऱ्या शाळा बंद करुन इतरत्र समायोजन करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कार्यवाहीमुळे अशा आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय होणार असून ते शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्याकरिता उपाययोजना करुन शासकीय माध्यमिक आश्रमशाळा बंद न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

आदिवासी विभागांर्तगत ४९६ शासकीय आश्रमशाळा असून सदर आश्रमशाळांमध्ये १९९४९८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सद्य:स्थितीत पटसंख्या कमी असल्याने कोणतीही शाळा बंद करण्यात आलेली नाही. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात येते. तसेच त्यांना शैक्षणिक व अन्य आवश्यक साहित्य खरेदीसाठी डी.बी.टी द्वारे रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केली जाते. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व बौध्दीक विकासासाठी प्रयत्न केले जातात. तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही व त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहावे लागणार नाही याबाबत काळजी घेण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जत (जि.सांगली) तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत**

**(५) * ८१२९३ श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील द्राक्ष बागायतदारांच्या द्राक्षांना कवडीमोल भाव मिळत असल्याने बिंळूर, डफळापूर, जत, बेंळूखी, कुंभारी व शेगाव येथील द्राक्ष उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच काही प्रयोगशील शेतकरी क्रिमसन सिडलेस द्राक्षाचे कमी खर्चात चांगले उत्पादन घेत असून या द्राक्षांना युरोप व आखाती देशात बाजारपेठ सरकारी पातळीवर मिळवून देण्याची मागणी बागायतदारांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन द्राक्ष उत्पादकांना योग्य भाव मिळणे तसेच परदेशी बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) सांगली जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकरी व्यापाऱ्यांना द्राक्षाची परस्पर विक्री करत असल्यामुळे, कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कमी प्रमाणात माल विक्रीसाठी येतो.

सन २०२३-२४ मध्ये सांगली कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये आवक झालेल्या द्राक्षाला प्रती क्विंटल किमान रुपये १७६३/- तर कमाल रुपये ४५०८/- इतका दर प्राप्त झाल्याचे दिसून येते.

(२) क्रिमसन सिडलेस या द्राक्षांना युरोप व आखाती देशात बाजारपेठ मिळवून देण्याबाबत द्राक्ष उत्पादकांकडून कृषि वा पणन विभागास कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही.

फलोत्पादन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, सांगली जिल्ह्यात क्रिमसन सिडलेस या वाणाची लागवड केली जात असून त्यापासून साधारणपणे प्रती हेक्टर १८ ते २२ मे.टन इतके उत्पादन होते. सदर वाणास युरोपियन देशामध्ये चांगली मागणी आहे.

(३) अपेडाच्या ग्रेपनेट प्रणालीवर द्राक्ष निर्यातक्षम बागांची नोंद करुन प्रमाणपत्र दिले जाते. सन २०२३-२४ मध्ये सदर प्रणालीवर देशात एकूण ४४,२९३ नोंदणी झाली असून त्यापैकी राज्यातील ४४,२८० (देशाच्या ९९%) द्राक्ष बागांची नोंदणी झालेली आहे.

राज्यात द्राक्ष निर्यातीसाठी अपेडा मान्यता प्राप्त १४६ पॅकहाऊस असून त्यापैकी सांगली जिल्ह्यात १८ पॅकहाऊस आहेत. तसेच द्राक्षे निर्यातीपूर्वी रसायनांचे अंश तपासणीकरीता राज्यात १५ प्रयोगशाळा उपलब्ध आहेत.

द्राक्षासह इतर कृषिमाल निर्यातीसाठी कृषि पणन मंडळामार्फत प्रत्येक महिन्यात हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्सचे आयोजन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मीरा-भाईंदर महानगरपालिकेत अनोंदणीकृत करारनामे वा कुलमुखत्यार पत्राव्दारे तसेच मुद्रांक शुल्क न भरताच बांधकाम परवानग्या, टीडीआर व भाडेपट्टा करार केल्याबाबत**

**(६) * ७९९०० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेत अनोंदणीकृत करारनामे वा कुलमुखत्यार पत्राव्दारे तसेच मुद्रांक शुल्क न भरताच बांधकाम परवानग्या देणे, टि.डी.आर. व भाडेपट्टा करार करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान केल्याचे दिनांक ४ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी महानगरपालिकेच्या कागदपत्रांच्या तपासणीकरीता ९ शासकीय अधिकाऱ्यांचे विशेष तपासणी पथकाची नियुक्ती केली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांनी अनेक विकासक, अधिकारपत्र धारकांना बांधकाम परवानग्या दिल्यामुळे अनधिकृत बांधकामात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने याबाबतची चौकशी करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल-मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री (गृह), मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच प्रधान सचिव, महसूल यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यालयाशी तसेच या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व कार्यालयांशी संबंधित असलेल्या कार्यकंत्राट, विकसन करार, टि.डी.आर. हस्तांतरण करार, भाडेपट्टा इ. संलेखावर यथोचित मुद्रांक शुल्क शासकीय जमा लेखांकन यंत्रणामार्फत राज्य शासनाकडे भरलेले आहे किंवा कसे याची सुनिश्चिती करण्यासाठी तपासणी पथक गठीत करण्यात आले असून सदर तपासणी पथकाचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेतील जमिन विकसनासाठी विकासक विकास प्रस्तावांना बांधकाम परवानगी घेणेकामी तसेच विकास योजनेतील आरक्षणाने बाधीत जागा हस्तांतरण करुन त्याचा मोबदला टी.डी.आर.च्या स्वरुपात मिळणेकामी मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडे आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करतात. सदर सादर केलेल्या प्रस्तावांसोबत नोंदणीकृत अधिकारपत्र / खरेदीखत सादर केले असल्याबाबतची खात्री महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. अनोंदणीकृत अधिकारपत्र / खरेदीखत असल्यास मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडून विकास परवानगी किंवा विकास हक्क प्रमाणपत्र देण्यात येत नाही.
(४) सदर प्रकरणाची तपासणी पथकाकडून चौकशी चालू असून तपासणी पथकाचा अहवाल शासनास अप्राप्त आहे. पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत विविध ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांना मजूरी न मिळाल्याबाबत

**(७) * ८०२७२ श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर),**

**श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये विशेषत: पालघर व बुलढाणा येथे रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या गरीब मजुरांना गत ६ महिन्यांपासून मजूरी न मिळाल्यामुळे त्यांचेवर उपासमारीची वेळ आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत मागेल त्याला १०० दिवस काम देण्याची हमी तसेच मजुरांना १५ दिवसाच्या आत मजुरी अदा करणेबाबत कायद्यात तरतूदी असतानाही त्याची अंमलबजावणी राज्यात न झाल्यामुळे अनेक मजूर मजूरीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या मजुरीचे सुमारे ६६२ कोटी रुपये केंद्र शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन मजूरांची थकीत मजूरी तात्काळ देणेबाबत तसेच यासंदर्भातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.
माहे मे, २०२४ पर्यंतची मजुरीची रक्कम केंद्र शासनाद्वारे मजुरांच्या खात्यात थेट जमा करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त न झाल्यामुळे माहे जून, २०२४ ची मजुरी प्रलंबित आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
माहे मे, २०२४ पर्यंतची मजूरी केंद्र शासनातर्फे मजुरांच्या बँक खात्यात थेट अदा करण्यात आलेली आहे. तथापि, आज रोजी ६१४.४० कोटी रूपये मजुरीची रक्कम केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यात होत असलेले अवैध रेती उत्खनन

**(८) * ८२३७० श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात मुरुम, रेती व गौण खनिजाचे मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन व विक्री होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच भंडारा जिल्ह्यातील रेती घाटाचे लिलावच झाले नसताना वाळू माफीयांनी सोंड्या नदी पात्रातील रेतीचे अवैध उत्खनन करून चांदपूर मुरली गावाजवळील टेकड्यांच्या पायथ्याशी तसेच तुमसर शहरातील प्लॉटींग केलेल्या मोकळ्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात डंम्पीग करून दामदुप्पटीने रेतीची अवैधरित्या विक्री करीत असल्याचे दिनांक १० मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील गौण खनिजांचे लिलाव दीड वर्षापासून झालेले नसून तर काही ठिकाणी लिलाव होऊनही परवानगी मिळाली नसल्याने गौण खनिज चोरीचे प्रकार वाढल्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन गौण खनिज लिलाव करण्याबाबत तसेच अवैध उत्खनन व विक्री रोखण्याबाबत त्याचप्रमाणे यातील दोषींवर व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) भंडारा जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२३ ते एप्रिल, २०२४ या कालावधीत गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतूकीचा एकूण ५०३ प्रकरणात कार्यवाही करण्यात येवून रू.६२१.५१ लक्ष दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच एकूण १४१ गुन्हे दाखल करण्यात येवून १३१ आरोपीला अटक केली व ४११ वाहने जप्त करण्यात आली आहेत. रेती तस्कर यांच्यावर एम.पी.डी.ए. कायद्यांतर्गत ३ कारवाई करण्यात आली आहेत. माहे फेब्रुवारी, २०२४ ते मे, २०२४ या कालावधीत जिल्हा भरारी पथकाव्दारे जिल्ह्यात एकूण १०,८०६ ब्रास अवैध रेती साठा जप्त करून नजिकचे वाळू डेपोमध्ये स्थलांतरीत करून विक्रीकरीता उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(२) भंडारा जिल्ह्यात वाळू घाटाकरीता १९ डेपो कार्यान्वीत करण्यात आले आहेत, तर ३ डेपो जप्त करण्यात आले आहे. सुरू असलेल्या डेपोमधुन ३,०६,२०३ ब्रास वाळू विक्रीकरीता उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तुमसर तालुक्यातील चारगाव, आष्टी, लोमी, मांडवी व सोंड्या या वाळू डेपोमधुन वाळू विक्रीकरीता उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

माहे फेब्रुवारी, २०२४ ते मे, २०२४ या कालावधीमध्ये भरारी पथकाव्दारा तुमसर तालुक्यात ७३५२ ब्रास अवैध रेती जप्त करून नजिकचे वाळू डेपोमध्ये स्थलांतरीत करून विक्रीस उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
(३) व (४) चंद्रपूर जिल्ह्यात सन २०२२-२३ मधे ३८ रेतीघाट लिलावामध्ये विक्री घेवून ०१,८७,७५५ ब्रास रेती उपलब्ध झाली आहे. तर सन २०२३-२०२४ मध्ये ६५ रेतीघाट लिलावाकरीता प्रस्तावित आहेत. सदर रेतीघाटांना पर्यावरण अनुमती मान्यता न मिळाल्याने रेतीघाट करीता डेपो निविदा काढण्यात आल्या नाहीत.

सन २०२३-२०२४ मध्ये महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ अन्वये मुरूम, स्टोन, माती, ओवरबर्डन, माती (विटासाठी) या गौण खनिजाकरीता १४४७ तात्पुरते परवाने देण्यात आले आहेत.

दिनांक ०१ एप्रिल, २०२३ ते ३० मार्च, २०२४ या कालावधीत जिल्ह्यात अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ४४७ प्रकरणात रू.०४.०५ कोटी दंडात्मक वसूली करून ४४७ वाहने जप्त करण्यात येवून ११ गुन्हे दाखल करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात गडचिरोली व भंडारा जिल्ह्यात वाळू खरेदी जास्त दराने करावी लागत असल्याने घरकुल लाभार्थी अडचणीत आल्याबाबत

**(९) * ८२७८४ डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास नवीन वाळू धोरण लागू केले असून या धोरणामुळे यापूर्वी सहाशे रुपयांना मिळणारी एक ब्रास वाळू आता दोन ते अडीच हजार रुपयांना घ्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढीव वाळू दर आणि त्यात वाहतूक व अन्य खर्चाचा अंतर्भाव केल्यास नदी काठावरील गावांना सुद्धा एक ब्रास वाळूसाठी साधारणतः दोन हजार ते अडीच हजार रुपये मोजावे लागत असून दूर असणाऱ्या घरकुल लाभार्थ्यांना एक ब्रास वाळूसाठी तीन हजार रुपयांचा खर्च करावा लागतो आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर्वीच्या वाळू धोरणात देण्यात येणारी स्वामित्व निधीतील सूट आता बंद करण्यात आली असून प्रतिब्रास ६०० रुपये स्वामित्व धन शुल्क आता वसूल करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घरकुल बांधकाम करणाऱ्या लाभार्थ्यांना शासनातर्फे ५ ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्याबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी काही जिल्ह्यात करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अनेक जिल्ह्यांमध्ये रेतीचा मुबलक साठा असतानाही रेती घाटांचे लिलाव न होणे त्यातच वाढीव वाळू दरामुळे होणारी विविध बांधकामे, घरकुले व शौचालये यांच्या बांधकामांवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) राज्यातील नागरिकांना बांधकाम योग्य वाळू स्वस्त दराने उपलब्ध करुन देणे तसेच अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व विक्री व्यवस्थापन करण्यासाठी दिनांक १९.०४.२०२३ च्या शासन निर्णयान्वये प्रायोगिक तत्वावर एक वर्षासाठी धोरण निश्चित करण्यात आले असून संपूर्ण राज्यासाठी रुपये ६००/- प्रती ब्रास वाळू विक्रीचा दर निश्चित करुन स्वामित्वधनाची रक्कम माफ केली होती.

या धोरणामुळे शासनावर पडणारा आर्थिक बोजा विचारात घेऊन ना-नफा-ना-तोटा या तत्त्वावर वाळू उत्खनन, डेपोपर्यंत वाहतूक व डेपो निर्मितीसाठी येणारा खर्च, स्वामित्वधनाची रक्कम व इतर शासकीय शुल्क इत्यादी विचारात घेऊन दिनांक १६.०२.२०२४ रोजी सुधारित वाळू धोरण निर्गती धोरण निश्चित केले. त्यानुसार वाळू विक्रीचा दर वाळू डेपो परत्वे वेगवेगळा राहणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलासाठी सक्षम प्राधिकारी यांनी सादर केलेली यादी संबंधित तहसिलदार यांनी तपासून तशी लेखी परवानगी दिल्यानंतर अवैध उत्खनन व वाहतूक कारवाई मध्ये जप्त केलेली वाळू, तसेच वाळू डेपोतून विनामुल्य ५ ब्रास पर्यंत वाळू उपलब्ध करुन देण्याची तरतूद सदर धोरणात केली असून राज्यात माहे एप्रिल, २०२३ ते आजतागायत १९,८६६ घरकुल लाभार्थ्यांना ५९,१४८ ब्रास वाळू मोफत उपलब्ध करुन दिली आहे.

राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाची स्थापना न झाल्याने वाळू गटाच्या पर्यावरण अनुमती अभावी राज्यामधील वाळू डेपो पूर्ण क्षमतेने सुरु झाले नाहीत. आता सदर प्राधिकरणाची स्थापना झाली आहे. तसेच वाळू गटाच्या पर्यावरण अनुमतीच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या Expert Appraisal Committee कडे सादर करुन पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेण्याच्या सूचनाही सर्व जिल्हाधिकारी यांना दिल्या आहेत.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील वहाळ (ता.चिपळूण) व देवघर (ता.गुहागर) येथे वणव्यामुळे आंबा-काजूच्या बागांचे नुकसान झाल्याबाबत

**(१०) * ७९६३८ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील अनेक भागांमध्ये वारंवार वणव्यामुळे लागलेल्या आगीत फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राजापूर (जि.रत्नागिरी) येथील सौंदळ-मांजरेवाडी, वडदहसोळ, वडवली, सडा तसेच लांजा तालुक्यातील धुदरे व देवधे या ठिकाणी नारळ, आंबा तसेच काजू झाडांच्या फळबागा वणव्यामुळे जळून लाखो रुपयांचे नुकसान

झाल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच वहाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शेतकरी श्री.रामचंद्र गणपत चव्हाण यांच्या गट नं.१४४ मधील बागेला दिनांक १७ फेब्रुवारी, २०२४ रोजी तसेच देवघर (ता.गुहागर) येथील श्री.संदीप कृष्णा चव्हाण यांच्या गट नं.८०९ मधील बागेला दिनांक ९ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास वणवा लागून मोठ्या प्रमाणात फळबागा व पाण्याच्या पाईपलाईन जळून खाक झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) त्याचप्रमाणे उरण (जि.रायगड) तालुक्यात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे भूमाफीया व व्यावसायिकांकडून मुद्दाम आगी लावल्यामुळे देखील शेतकऱ्यांच्या फळबागा जळाल्याचे दिनांक २४ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त ठिकाणच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या फळबागांचे तात्काळ पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी तसेच तहसीलदार, गुहागर यांच्याकडे दिनांक १३ मार्च, २०२४ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन वणव्यामुळे लागणाऱ्या आगीवर नियंत्रण आणणे, वणवा टाळण्यासाठी उपाययोजना करणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) रत्नागिरी जिल्ह्याबाबत हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) नाही, उरण तालुक्यात अशी घटना घडलेली नाही.
(५) होय, हे खरे आहे.
(६) वणव्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची तरतूद नाही. मात्र, मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून निधी मिळणेबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी प्रस्ताव मुख्यमंत्री सहाय्यता निधी कडे सादर केला आहे.
आंबा, काजू बागेमध्ये वणवा लागू नये म्हणून बागेची साफसफाई करुन बागा स्वच्छ ठेवणे, गवताचे योग्य व्यवस्थापन करणे याबाबत वेळोवेळी शेतकऱ्यांना शेतीशाळा तसेच शेतकरी सभा, शेतकरी मेळावे यामधून मार्गदर्शन करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परळ (मुंबई) येथील अपना सहकारी बँकेत सुरु असलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(११) * ८२९२४ श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळ (मुंबई) येथील अपना सहकारी बँकेत ठेवीदारांच्या रकमांचा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठेवीदारांनी शेअर्सच्या रकमा, ठेवींवरील लाभांश, व्याज मिळणेबाबत वारंवार अर्ज व निवेदने करुनही ते अद्याप परत न केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बँकेच्या संचालकांनी वैयक्तीक फायद्यासाठी आवश्यक नसतानाही विविध ठिकाणी बँकेच्या शाखा स्थापन केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बँकेच्या व्यवस्थापक मंडळाने बँकेच्या कर्मचाऱ्यांवर बळजबरी करुन त्यांच्या नातेवाईकांना बँकेत ठेवी ठेवण्यास भाग पाडले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन ठेवीदारांच्या ठेवी परत देण्याबाबत तसेच बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) अपना सहकारी बँक, लि. मुंबई ही बँक बहुराज्यीय बँक आहे. सहकार आयुक्त कार्यालयास बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४ (४) अन्वये लवाद नियुक्त करण्याव्यतिरिक्त इतर कोणतेही वैधानिक अधिकार नाहीत. सदर बँकेचे निबंधक हे केंद्रीय निबंधक तथा अतिरिक्त सचिव, सहकार विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली आहेत. सदर बँकेवर कारवाई करण्याचे सर्व प्रशासकीय अधिकार भारत सरकारचे केंद्रीय निबंधक व भारतीय रिझर्व्ह बँक यांना आहेत.

अपना सहकारी बँकेतून भागधारण रक्कम परत मिळाली नसल्याबाबत श्री.मोरे या सभासदाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांच्याकडे दिनांक २४.०१.२०२४ रोजी तक्रार केली होती. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एफ.एस. विभाग, मुंबई यांनी दिनांक ०७.०२.२०२४ रोजीच्या पत्राने बँकेस कळविले आहे. याव्यतिरिक्त सहकार विभागाकडे कोणत्याही तक्रारी प्राप्त नाहीत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्राच्या पश्चिम घाटात, विशेषत: कोकण पट्ट्यात दरवर्षी पावसाळ्यात दरडी कोसळून गावे नष्ट होत असल्याबाबत

**(१२) * ८३६६८ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री. पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राच्या पश्चिम घाटात, विशेषत: कोकण पट्ट्यात दरवर्षी पावसाळ्यात दरड कोसळून, गावेच्या गावे नष्ट होण्याच्या घटना घडल्या आहेत, या पार्श्वभूमीवर कोकणातील ७ जिल्ह्यांत ६१३ गावे आजही दरड प्रवणक्षेत्राच्या छायेत असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहयाद्रीच्या पश्चिम घाटात दरड कोसळून त्यात गावे गडप होण्याच्या घटना मागील १० वर्षात वाढल्या असून, रायगडमध्ये मागीलवर्षी इर्शाळवाडी, त्यापूर्वी तळीये, तिवरे, माळीण या गावांवर दरडी कोसळून अनेकांचे प्राण जावून गावे नष्ट झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दुर्घटना पाहता शासनाने या जिल्ह्यामधील दरड प्रवण गावामध्ये उपाययोजना करणे गरजेचे असून यामधील ३० ते ३५ ठिकाणे अतिधोकादायक असल्याचा अहवाल केंद्र आणि राज्य शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दरड प्रवण वाड्या व गावांमध्ये तातडीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) नाही.

जिओलॉजिकल सर्वे ऑफ इंडीयाच्या सर्वेक्षणात ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये ३४७७ गावे तर आय.आय.टी. दिल्ली यांच्या सर्वेक्षणात ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये ५७९९ गावे दरड प्रवण दर्शविण्यात आली आहेत.
(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) i. नाही.
ii. जिओलॉजिकल सर्वे ऑफ इंडीयाच्या व आय.आय.टी. दिल्ली यांच्या सर्वेक्षण अहवालाच्या आधारे महाराष्ट्र राज्य भूस्खलन व्यवस्थापन आराखडा-२०२४ तयार करण्यात आला आहे.
iii. सदर आराखड्यात कोकण विभागातील अतिधोकादायक व मानवी रहिवास असलेली २२८ गावे निश्चित केली आहेत. त्या गावांमध्ये दरड प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना दिनांक २२ मार्च, २०२४ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. त्यानुसार कोकणातील ठाणे, सिंधुदूर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्ह्यांनी ९२ ठिकाणी दरड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे १७८.६७ कोटीचे प्रस्ताव शासनास सादर केले असून त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.
iv. याशिवाय रायगड जिल्ह्याने अन्य १४ कामांचे दरड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे ५७.२७ कोटीचे प्रस्ताव शासनास सादर केले असून त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.
v. मुंबई उपनगरातील दरड प्रवण क्षेत्रामध्ये दरड प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या ३१ कामांचा ३२५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनास सादर केला असून त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.
vi. तसेच राज्य शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयाव्दारे भूस्खलन/दरड प्रवण क्षेत्रातील गावांचे/क्षेत्राचे/वाडीचे पुनर्वसन करण्याचे धोरण निश्चित केलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने सुरू केलेल्या नमो शेतकरी महसन्मान निधी योजनेबाबत

**(१३)** * **८२६६९ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरिता केंद्र शासनाने सुरू केलेल्या पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी (पीएम किसान) योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजीपासून नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत संबंधीत खातेदार शेतकरी कुटुंबाच्या नावे असलेली जमीन धारणा विचारात घेऊन शेतकऱ्याला प्रथम हप्ता वितरित करण्यात आला असून सदर योजनेसाठी पात्र लाभार्थी निश्चितीसाठी शेवटची तारीख १ फेब्रुवारी, २०१९ ही होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यानंतर लाभार्थी यादीमध्ये पुढील पाच वर्षासाठी बदल करता येणार नाही, असे केंद्र शासनाच्या दिनांक २१ जून, २०१९ रोजीच्या सुधारित मार्गदर्शक सूचनेतील परिच्छेद क्रमांक ५.२ मध्ये नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ नंतर ज्या शेतकऱ्यांकडे खरेदी, बक्षीस पत्र, वारसाहक्क वा मृत्यूपत्राद्वारे जमीन आलेली आहे त्या शेतकऱ्यांना पाच वर्षाचा कालावधी संपेपर्यंत या योजनेचा लाभ घेता येत नाही, तसेच हाच निकष राज्य सरकारच्या नमो शेतकरी सन्मान योजनेला सुद्धा लागू आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू अट शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत जाचक व आर्थिकदृष्ट्या नुकसान करणारी असल्यामुळे ती राज्य शासनाने तातडीने काढण्याबाबत तसेच केंद्र शासनाकडे देखील ही अट काढण्याबाबत पाठपुरावा करुन दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ नंतरच्या शेतकऱ्यांना देखील या योजनेचा लाभ देण्याची मागणी शेतकऱ्यांनी मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या PM-KISAN योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने दिनांक १५ जून, २०२३ च्या शासन निर्णयान्वये नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरु केली आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) होय, हे ही खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पी.एम. किसान पोर्टलवर नोंदणी केलेले व केंद्र शासनाच्या निकषानुसार लाभास पात्र ठरलेले सर्व लाभार्थी नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या लाभासाठी पात्र ठरतात. तसेच केंद्र शासनाने लाभार्थी पात्रतेबाबत वेळोवेळी निकषांमध्ये केलेले बदल तात्काळ परिणामाने नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांना देखील लागू आहेत.

(५) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक २१ जून, २०१९ रोजीच्या पी.एम. किसान योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार पी.एम. किसान योजनेच्या लाभासाठी जमिनधारणा कट ऑफ निश्चित केलेला दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१९ असा आहे. त्यामध्ये पुढील पाच वर्षे पात्रतेसाठी कोणताही बदल विचारात घेतला जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे. तथापि, दिनांक २१ जून, २०२४ रोजी उपरोक्त मार्गदर्शक सूचनेस पाच वर्ष पूर्ण झालेले असल्याने दिनांक २५ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास अट शिथील करण्याबाबत विनंती केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरुड व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्याबाबत

**(१४) * ८३३८२ श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात माहे जुलै, व ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे वरुड शहरामधुन वाहत असलेली चुडामणी नदी व शेंदुरजनाघाट शहरामधुन वाहत असलेल्या जिवणा व देवणा तसेच मोर्शी शहरातुन वाहणाऱ्या नलदमयंती नदीला पूर आल्यामुळे नदीकाठावरील घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून जिवीत व वित्तहानी होत असून शेतकऱ्यांच्या जमिनीही खरडून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त भागातील करण्यात आलेल्या पंचनाम्यानुसार नुकसानीच्या तुलनेत अत्यल्प मोबदला देण्यात आलेला असून कायमस्वरुपी जमिनी खरडून गेल्याप्रकरणी कोणतीही नुकसान भरपाई अद्याप देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानीच्या तुलनेत वाढीव मोबदला, शेतकऱ्यांना पूर्ण नुकसान भरपाई तसेच उक्त शहरातुन वाहणाऱ्या नद्यांच्या पूरापासुन संरक्षण मिळण्याकरिता उक्त तिनही नद्यांवर पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) माहे जून ते ऑगस्ट, २०२२ मधील २० जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे तसेच उद्भवलेल्या पूर परिस्थितीमुळे अमरावती जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना शेती पिकांच्या नुकसानीसाठी रुपये ५३३१४.६५ लक्ष निधी तसेच शेतजमिनीच्या नुकसानीकरीता रुपये ९०४.८८ लक्ष निधी वितरणास शासन निर्णय क्र.सीएलएस २०२२/ प्र.क्र.२९७/म-३, दिनांक ०८.०९.२०२२ अन्वये निधी वितरणास मान्यता दिली आहे.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याकडून आपत्ती सौम्यीकरणांतर्गत दिनांक २६.०२.२०२४, १५.०३.२०२४ व २८.०५.२०२४ रोजी वरुड व मोर्शी शहरातुन वाहणाऱ्या नद्यांच्या पूर संरक्षण भिंतीचे नदी/नाला खोलीकरणाचे प्रस्ताव प्राप्त झाले असुन याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाथरी व जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील मसला तांडा शिवारामध्ये होत असलेले अवैध उत्खनन

**(१५) * ८२७७२ श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील मसला तांडा शिवारामध्ये गोदावरी पात्रात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या गौणखनिज उत्खनन केले जात असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल प्रशासनाकडून मसला तांडा येथील गट क्र.१० मध्ये माती उत्खननाची परवानगी घेऊन दुसऱ्याच ठिकाणी अवैधरित्या माती उत्खनन सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मौजे वझर (ता.जिंतूर, जि.परभणी) येथे पूर्णानदी पात्रातील वाळू घाटावर अवैधरित्या अडीचशे ते तीनशे ब्रास वाळू उपसा करून सुमारे १७ लाख रुपयांची वाळू चोरी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत तसेच संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) तहसिलदार पाथरी यांचे आदेश दिनांक ०६.०५.२०२४ अन्वये मौ.मसला तांडा येथील ग.क्र.१० मधुन १०० ब्रास माती उत्खननाची परवानगी देण्यात आलेली असून त्याच गटातून नियमाप्रमाणे मातीचे उत्खनन करण्यात आलेले आहे. कोणत्याही प्रकारे अवैध गौण खनिजाचे उत्खनन किंवा वाहतूक करण्यात आलेली नाही.

(३) व (४) मौजे वझर बु. ता.जिंतुर, जि.परभणी येथे पूर्णा नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करताना आढळून आलेला आहे. स्थळाची ड्रोनव्दारे मोजणी करण्यात आली असून १७४.३३७ ब्रास वाळूचे उत्खनन झाल्याचे दिसून आले आहे.

त्यानुषंगाने संबंधितावर महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) व ४८ (८) अन्वये रू.५९,५३,६०९/- एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम १७८ नियम, ५ अन्वये आर.आर.सी. ची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरकरवाडा (जि.रत्नागिरी) येथे डिझेल सवलत मिळण्याकरीता नौकांची तपासणी व प्रमाणिकरण तातडीने पूर्ण करण्याबाबत

**(१६) * ८०७९८ श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील मिरकरवाडा बंदरावर पेट्रोलपंपावरून येणाऱ्या टँकरद्वारे अनधिकृतपणे डिझेल विक्री होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छीमार सहकारी संस्थांच्या नौकांची तपासणी व प्रमाणिकरण झाल्याशिवाय सहकारी संस्थांनी डिझेल वितरीत न करण्याचे आदेश मत्स्यव्यवसाय सहाय्यक यांचेमार्फत देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित पेट्रोलपंप धारकांना कारवाई संदर्भात नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तपासणी व प्रमाणिकरण न झालेल्या नौकांना डिझेल विक्री बंद ठेवल्याने मच्छीमार संस्थांचा तोटा होत असल्याने राजीवडा महिला मच्छीमार सहकारी संस्थेने आक्रमक भूमिका घेतली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन डिझेल सवलत मिळण्याकरिता नौकांची तपासणी व प्रमाणिकरण तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

रत्नागिरीतील काही डिझेल पंपाचे टँकर मिरकरवाडा येथे येऊन डिझेल विक्री करीत असल्याने मिरकरवाडा येथील संस्थेच्या पंपावरील डिझेल विक्रीवर परिणाम होत असल्याची तक्रार सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रत्नागिरी यांच्याकडे करण्यात आली होती. त्यानुषंगाने खाजगी डिझेल टँकर मिरकरवाडा बंदरावर येण्यास प्रतिबंध करण्यात यावा, असे मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहे.

नौकांचे तपासणी व प्रमाणिकरण करण्याचे काम सध्या सुरू आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) मासेमारी नौकांचे तपासणी व प्रमाणिकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. पावसाळी मासेमारी बंदी कालावधीमध्ये बऱ्याचशा नौका शाकारून ठेवल्याने त्यांची प्रत्यक्ष पाहणी करणे अडचणीचे ठरत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या वनहक्क दाव्यासह अन्य मागण्यांबाबत

**(१७) * ८२४२० श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात आदिवासी विकास विभागाकडे दाखल झालेल्या ५६४३१ वनहक्क दाव्यांपैकी जवळजवळ २२००० दावे तांत्रिक कारणास्तव फेटाळण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी आदिवासी शेतकऱ्यांनी माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले असता मा.पालक मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या आश्वासनानंतर सदर आंदोलन मागे

घेतले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या वनहक्क दाव्यासह अन्य मागण्यांच्या अनुषंगाने अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन आदिवासी शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) वनहक्क कायद्यातंर्गत नाशिक जिल्ह्यात माहे मे, २०२४ अखेर जिल्हास्तरिय वनहक्क समिती, नाशिक यांचेकडे एकूण ५५३११ वैयक्तीक वनहक्क दावे व अपिल आणि एकूण ८९९ सामूहिक वनहक्क दावे व अपिल प्राप्त झाले आहेत. त्यापैकी एकूण ३२,६०३ वैयक्तिक वन हक्क दावे व अपिल आणि एकूण ८२८ सामूहिक वनहक्क दावे व अपिल जिल्हास्तरिय वनहक्क समितीकडून मान्य करण्यात आले आहेत. तसेच एकूण २१८३९ वैयक्तीक वनहक्क दावे व अपिल आणि एकूण ७१ सामूहिक वनहक्क दावे व अपिल अमान्य करण्यात आले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) जिल्हास्तरिय वनहक्क समितीकडे प्रलंबित असलेले वैयक्तीक वनहक्क दावे व अपिल आणि सामूहिक वनहक्क दावे व अपिल निकाली काढण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.
शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५.०३.२०२४ व १८.०६.२०२४ रोजी आढावा बैठक घेण्यात आली आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या मागण्यांपैकी काही मागण्यांवर कार्यवाही झाली असून उर्वरित मागण्यांच्या संदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्य सचिव यांनी उक्त बैठकीत संबंधित विभागास दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा सुमठाणा (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील तलाठी व मंडळ अधिकारी यांनी पदाचा दुरुपयोग केल्याबाबत

**(१८) * ८३९१८ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा सुमठाणा (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील त.सा.क्र.२२ येथील सर्व्हे क्र.२/१ चे जिल्हाधिकारी नागपूर यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१२ च्या आदेशानुसार एन.ए. (NA) मंजूर केल्यानंतर दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास सुधारित एन.ए. (NA) मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच कार्यकारी अभियंता मेट्रो व नागपूर सुधार प्रन्यास यांनी दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या आदेशानुसार नकाशाला मंजुरी दिली असतानाही हिंगणा तालुक्यातील वानाडोंगरीचे मंडळ अधिकारी श्री.चुटे व कोठेवाडाचे तलाठी श्रीमती भोयर यांनी पदाचा दुरुपयोग करून भूखंड क्र. ८,११,१२,१७ व १८ ची फेरफार व ७/१२ मध्ये नोंद करून रेकॉर्ड उपलब्ध नसल्याचे कारण देऊन फेरफार करण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मंडळ अधिकारी व तलाठी यांनी रेकार्ड उपलब्ध नाही म्हणून फेरफार घेता येत नाही असे दिनांक २१ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास तहसीलदार यांना लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मंडळ अधिकारी व तलाठी हे अनेक वर्षांपासून त्या पदावर कार्यरत असून त्यांनी केलेल्या अनेक नियमबाह्य कामांमुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जिल्हाधिकारी, नागपूर यांनी एन.ए. (NA) च्या आदेशामध्ये संबंधिताकडून महसूल कर वसूल करण्याबाबत कळवूनही मंडळ अधिकारी व तलाठी यांनी अद्यापही कर वसूल केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली तसेच यातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) मौजा सुमठाणा, ता.हिंगणा, जि.नागपूर येथील स.क्र.२/१ चे अवलोकन केले असता, सदर जमिन ही अकृषक असून जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाचे आदेश दिनांक २७.०३.२०१२ नुसार निवासी प्रयोजनार्थ अकृषक आदेश पारीत करण्यात आले आहे. सदरील स.क्र.२/१ च्या अभिन्यास नकाशास जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाने दिनांक ०१.०४.२०१७ रोजी प्रमाणित केलेले असून कार्यकारी अभियंता मेट्रो व नागपूर सुधार प्रन्यास यांनी अभिन्यासास मंजूरी दिलेली आहे.

प्रमाणित केलेल्या अभिन्यासातील Area Statements नुसार Plotable Area Open Space, Road याकरिता दर्शविण्यात आलेले क्षेत्र आणि शिल्लक राहत असलेले क्षेत्र यात तफावत येत असल्यामुळे संबंधित अर्जदाराकडून सुधारित अभिन्यास मागविण्यात आला होता. जर वरील नकाशानुसार ७/१२ तयार केल्यास भौगोलिक क्षेत्रात वाढ होईल आणि अडचणी निर्माण होईल म्हणून अर्जदार यांनी सादर केलेल्या विक्री पत्रानुसार भूखंडाचे फेरफार घेण्यात आले नाही. तसेच अर्जदाराने सुधारित अचूक नकाशा सादर केल्यास नकाशाप्रमाणे भूमी अभिलेख विभागाकडून कमी जास्त पत्रक प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे भूखंडनिहाय ७/१२ तयार करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(३) सदर बाब दिनांक २१.०६.२०२२ रोजी तत्कालीन तहसिलदार यांना लेखी अहवाल सादर करुन त्यांचे निदर्शनास आणून देण्यात आलेली होती आणि सुधारित अचूक क्षेत्राचा मंजूर अभिन्यास तलाठी रेकॉर्डला उपलब्ध नसल्यामुळे संबंधित अर्जदाराकडून मागविण्यात आला होता.
(४) तहसिलदार हिंगणा जि.नागपूर यांनी सादर केलेल्या खुलासानुसार नियमबाह्य कामे केल्याबाबत कोणताही ठपका मंडळ अधिकारी व तलाठी यांचेवर नसून सन २०२१ मध्ये जिल्हापरिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेत अनियमिततेबाबत तलाठी, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक, निवडणूक नायब तहसिलदार, तत्कालीन तहसिलदार यांचेवर एकत्रित निलंबनाची कार्यवाही प्रस्तावित झालेली होती. त्यामध्ये मंडळ अधिकारी पदावर श्री.चुटे होते. सन २००२ मध्ये तलाठी भोयर यांचे तलाठी रेकॉर्डच्या अलमारीच्या चाव्या दुसऱ्या तलाठी यांचेकडे असल्याने चुकीचा वापर केला म्हणून त्या बेजबाबदारीबाबत निलंबनाची कार्यवाही झाली होती.
(५) खातेदार अमित एकनाथ किनकर यांनी २०१३-२०१९ पर्यंत अकृषक कर भरलेला असून २०२० ते २०२४ चे ५ वर्षाचा अकृषक कर रुपये ५४००/- थकीत असून सुधारित अभिन्यासाप्रमाणे रितसर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर शासकीय कर वसूल करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील वाढवण समुद्रात दगड व रेती उपसा सुरु असल्याबाबत

**(१९) * ७९८०५ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील बंदरपट्टी भागातील वाढवण येथील परिसरातून मागील अनेक महिन्यापासून मोठ्या प्रमाणात विनापरवाना दगड, माती व रेती उपसा सुरू असल्याने समुद्र किनाऱ्याची धूप होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची परवानगी न घेता करण्यात येणाऱ्या सदर बेकायदा उपशांमुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी महसूल विभागाकडून कारवाई करण्याची मागणी सर्वसामान्य जनतेकडून होत असूनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अवैध उत्खनन थांबविण्याबाबत तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कार्यवाही करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) दैनिक लोकमत वृत्तपत्रामध्ये दिनांक ०६.०४.२०२४ रोजी "डहाणू तालुक्यातील बंदरपट्टी भागातील वाढवण येथील समुद्रातून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररित्या दगड, माती, रेती उपसा सुरु" अशा आशयाची बातमी प्रसिद्ध झाली.

सदर बातमीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी चिंचणी, तलाठी सजा बाडापोखरण यांनी वाढवण गावातील ग्रामस्थ यांचेसमवेत चौकशी केली असता मौजे वाढवण येथील समुद्र किनारी व परिसरातून दगड, माती, रेती उपसा होत असल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच ग्रामपंचायत वाढवण, तलाठी सजा बाडापोखरण, मंडळ अधिकारी चिचणी व तहसिल कार्यालय डहाणू येथे कोणत्याही संघटना, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक ग्रामस्थ यांचेकडून अवैध गौण खनिज उत्खननाबाबत कोणतीही लेखी व तोंडी तक्रार दाखल केलेली नाही.

तसेच डहाणू तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीवर आळा घालण्यासाठी कार्यालयीन पथकामार्फत कारवाई करण्यात येत आहे.

डहाणू तालुक्यातील मौजे आगर, नरपड, आंबेवाडी, चिखले, बडकती, घोलवड, बोडी या गावांतील समुद्र किनारी बैलगाडी पिकअप सारखी छोटी वाहने जाणार नाहीत यासाठी जोडरस्त्यांवर JCB च्या सहाय्याने ५ फूट खोल चारी/खड्डे खोदून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## वडगाव (ता.मावळ, जि.पुणे) येथे महसूल विभागांतर्गत कार्यालयाच्या कामकाजाची उच्चस्तरिय चौकशी करण्याबाबत

**(२०) * ८१३५१ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव (ता.मावळ, जि.पुणे) येथे महसूल विभागाचे भूमी अभिलेख कक्ष, रेशन विभाग, पंचायत समिती, नागरी सुविधा केंद्र, सहायक दुय्यम निबंधक कार्यालयासह तलाठी व मंडल अधिकारी कार्यालय इ. ठिकाणी खाजगी एजंटाचा वावर वाढला असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांच्या संगनमताने उक्त खाजगी एजंट विविध कामांकरिता पैसे घेत असल्याने सामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे, तसेच जे नागरिक कामासाठी पैसे देत नाहीत त्यांचे अर्ज विचारात घेतले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त तालुक्यात महसूल विभागातील ७/१२ च्या दप्तरी खोट्या नोंदी व बेकायदा खरेदीखते करण्यात येत असून कोणत्याही प्रकारची चौकशी न करता पैसे घेवून अनेक फेरफार करण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वडगाव मावळ येथे महसूल विभागाच्या कार्यालयाच्या कामकाजाची उच्चस्तरिय चौकशी करून दोषी अधिकारी व एजंटवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) भूमी अभिलेख विभागाचे कामकाज ई-मोजणी, ई-पीसीआयएस, ई-महास्वामित्व या संगणकीय प्रणालीद्वारे चालते. सदर कामकाज संगणकीय प्रणालीद्वारे होत असल्याने खाजगी एजंट किंवा मध्यस्थ यांच्या हस्तक्षेपास वाव नाही. खाजगी एजंटच्या हस्तक्षेपाबाबत उप अधिक्षक भूमी अभिलेख, मावळ यांचे कार्यालयात कोणत्याही स्वरूपाची लेखी तक्रार प्राप्त नाही.

तहसिल कार्यालय मावळ येथील पुरवठा विभागात शिधापत्रिका विषयक व धान्य वितरणाचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने केले जाते. त्यामुळे खाजगी एजंट किंवा मध्यस्थ यांच्या हस्तक्षेपास वाव नाही.

विविध शासकीय दाखले नागरी सुविधा केंद्र व महा ई-सेवा केंद्र यांचेमार्फत ऑनलाईन पध्दतीने दिले जातात. दाखले वितरणाची सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने असल्यामुळे त्यामध्ये खाजगी एजंट किंवा मध्यस्थांना वाव नाही. विविध प्रकारचे दाखले शासनाने ठरवून दिलेली फी आकारून दिली जातात त्यामध्ये कोणाचीही आर्थिक पिळवणूक होत नाही.

मावळ तहसिल कार्यालयांतर्गत सर्व मंडल अधिकारी व तलाठी यांचेद्वारे सातबारा उतारा, खरेदीखते यांसंबंधी सर्व कामकाज ऑनलाईन पध्दतीने ई-फेरफार प्रणालीमार्फत केले जाते. तसेच दुय्यम निबंधक यांचेकडील दस्त नोंदणीचे कामकाज हे आय-सरिता या ऑनलाईन संगणक कार्यप्रणालीद्वारे करण्यात येते. सदर सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने असल्यामुळे त्यामध्ये खाजगी एजंटच्या हस्तक्षेपास वाव नाही. दस्त नोंदणीबाबत शेतकऱ्यांना नाहक त्रास झाल्याबाबतची तक्रार प्राप्त नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात तलाठी भरती परिक्षेत मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहार**

**(२१) * ७९६०२ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घेण्यात आलेल्या तलाठी भरती परिक्षेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन कारवाई करण्याच्या मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर, बीड, सातारा व राज्यातील इतर ठिकाणी शेकडो परिक्षार्थींनी दिनांक १६ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून आंदोलने केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करुन सर्वच परिक्षा एम.पी.एस.सी. मार्फत घेण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते यांनी माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) तलाठी पदभरती परीक्षा, २०२३ दरम्यान ८ ठिकाणी अनुचित प्रकार घडल्याचे निर्दशनास आले आहे. त्याबाबत संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दोडामार्ग (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यात शेतकऱ्यांना चांदा ते बांदा योजनेंतर्गत दिलेल्या पशुंचा विविध आजाराने मृत्यू झाल्याबाबत**

**(२२) * ८०१५८ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने चांदा ते बांदा विकास योजनेंतर्गत शेळी-बोकड वाटप कार्यक्रमाद्वारे दोडामार्ग (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील ३७ जणांना गावठी शेळया व बोकडांचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विचित्र आजाराची लागण झालेली जनावरे या कार्यक्रमांतर्गत वाटप करण्यात आल्याने सदर जनावरे व त्यांच्या संपर्कात येवून शेतकऱ्यांच्या स्वत:च्या जनावरांचा देखील मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी जनावरे मृत्यूमुखी पडत असल्याने सर्व ठिकाणच्या पशुसंवर्धन दवाखान्यांमध्ये औषध फवारणीची मागणी केली व आवश्यकता असतानाही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाटप करण्यात आलेली व शेतकऱ्यांची स्वत:ची अशी दोन्ही जनावरे मृत्यूमुखी पडल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शासकीय यंत्रणेकडून अद्यापही लाभार्थ्यांना कोणतीही आर्थिक मदत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) चांदा ते बांदा योजनेंतर्गत दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग येथे ३० लाभार्थ्यांना शेळी गट वाटप करण्यात आले होते.
(२) होय.
(३), (४) व (५) शेळी गट वाटप योजनेत वाटप करण्यात येणाऱ्या पशुंचा विमा उतरवणे बंधनकारक असताना दोडामार्ग येथे वाटप करण्यात आलेल्या शेळयांचा विमा उरविण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे.
महसूल व वन विभागाच्या दिनांक २७.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार नैसर्गिक आपत्ती मृत्यूमुखी पडलेल्या पशुधनास नुकसान भरपाई देण्यात येते. सदर बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये समावेश नसल्याने नुकसान भरपाई देय ठरत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांपैकी बहुतांश कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२३) * ८२६३० श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातर्फे आर्थिक वर्षात घेण्यात आलेल्या विक्रमगड तालुक्यातील सुमारे १३० रस्त्यांच्या कामांपैकी बहुतांश कामे अपूर्ण असतानाही प्रशासनाच्या संगनमताने कंत्राटदारास रुपये १३ कोटींची देयके अदा केल्याची बाब दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान रस्त्यांची दुबार कामे दाखवून सुमारे रुपये १० कोटींचा निधी मंजूर केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील पाच तालुक्यातील दुष्काळग्रस्तांना निविष्ठा अनुदान मिळण्याबाबत

**(२४) * ८२२९२ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गतवर्षी ऑक्टोबर महिन्यानंतर जाहिर झालेल्या दुष्काळी तालुक्यांच्या यादीत सोलापूर जिल्ह्यातील पाच तालुक्यांचा समावेश झाला असून या तालुक्यात सुमारे ५ लाख १९ हजार ८४९ शेतकरी असूनही आतापर्यंत केवळ ६० हजार शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड करण्यात आल्याने लाखो शेतकरी अद्याप दुष्काळी मदतीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरासरीपेक्षा कमी पावसामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सद्य:स्थितीत जमिनीतील पाणी पातळी खालावल्याने पाण्याअभावी शेती करणे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अडचणीचे ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी पाच तालुक्यातील शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड करून सर्व शेतकऱ्यांना जाहिर झालेली मदत तात्काळ देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) खरीप-२०२३ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील माढा, करमाळा, बार्शी, सांगोला आणि माळशिरस या ५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहिर झाल्याने बाधित शेतकऱ्यांच्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता कृषी विषयक मदतीसाठी दिनांक २९.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये ५१९८४९ खातेदारांना निविष्ठा अनुदान देण्यासाठी रुपये ६८९००.१६ लक्ष निधी मंजूर झाला आहे.

सद्य:स्थितीत MAHA IT यांचेकडून विकसित करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीद्वारे सोलापूर जिल्ह्यातील ३२३६५९ बाधित शेतकऱ्यांच्या रुपये ४७५.१६ कोटी रक्कमेच्या याद्या पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली आहे. त्यापैकी रुपये ४११.७५ कोटी रक्कम वितरित करण्यात आले असून, उर्वरित खातेदारांची रक्कम अदा करण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मच्छीमार व्यावसायिकांना अद्ययावत यंत्र सामुग्री व सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२५) * ८००६१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सातत्याने होणारे हवामानातील बदल, समुद्रातील वाढता मानवी हस्तक्षेप आणि वाढत्या जलप्रदुषणामुळे सागरी क्षेत्रात दिवसेंदिवस मत्स्य उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट होत असून त्यावर उपजिविका करणाऱ्या लाखो मच्छीमारांवर देखील उपासमारीची वेळ आल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परराज्यातील यांत्रिक तसेच यंत्रचलित मासेमारी नौकांवर प्रतिबंध घालणे व अवैध पर्ससीन तसेच एलईडी मासेमारीवरील बंदीबाबतची अंमलबजावणी होत नसल्याने राज्याच्या सागरी हद्दीत परराज्यातील मच्छीमारांनी घुसखोरी केल्याने पारंपारिक मच्छीमारांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एलईडी, पर्ससीन मासेमारीमुळे जैवविविधतेचा समतोल बिघडत असून अनेक प्रजाती नष्ट होत असून याला प्रतिबंध करण्याकरिता शासनाने एलईडी, पर्ससीन मासेमारी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील मत्स्यव्यवसाय वाढविण्यासाठी मत्स्य व्यावसायिकांना अद्ययावत यंत्रसामुग्री आणि सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच यातील संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्याची मागील ३ वर्षाची मत्स्योत्पादनाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. सन २०२०-२१ मध्ये ३.९९ टन, सन २०२१-२२ मध्ये ४.३३ टन व सन २०२२-२३ मध्ये ४.४६ टन सदरचे मत्स्यउत्पादन पाहता

मत्स्योत्पादनात घट झाली नसल्याचे दिसून येत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

रत्नागिरी-सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या सागरी जलधी क्षेत्रात परराज्यातील मासेमारी नौका घुसखोरी करून मासेमारी करीत असल्याचे यापूर्वी निदर्शनास आले. त्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने विभागास उपलब्ध झालेल्या वेगवान गस्ती नौकांव्दारे राज्याच्या जलधी क्षेत्रात प्रभावीपणे गस्त घालून अशा परराज्यातील नौकांवर कारवाई करण्यात येत आहे.

राज्याच्या जलधी क्षेत्रात सागरी कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करून अनधिकृतरित्या मासेमारी करणाऱ्या नौका निदर्शनास आल्यास अशा नौकांवर सागरी कायद्यातील तरतुदीन्वये कारवाई करण्यात येत आहे. परराज्यातील घुसखोरी करणाऱ्या मासेमारी नौकांचा वेग जास्त असल्यामुळे त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडण्याकरिता ५ अतिवेगवान गस्ती नौका भाडेपट्टीने घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. याबाबत ई-निविदा प्रक्रिया राबवून ५ अतिवेगवान गस्ती नौका कार्यरत करण्याबाबत पुरवठा धारकास आदेश दिले असून रत्नागिरी, रायगड जिल्ह्यास अतिवेगवान गस्ती नौका उपलब्ध झालेली असून उपलब्ध गस्ती नौकेव्दारे प्रभावीपणे गस्त घालण्यात येत आहे.

(४) केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने मत्स्यउद्योग व व्यवसाय वाढविण्यासाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शित साखळी व्यवस्थापनासाठी Ice Plant, Cold Storage, शितवाहन पुरवठा करण्यासाठी योजना, खोल समुद्रात मासेमारीकरिता नौका बांधणी Upgradation of fishing vessels व इतर योजना राबविण्यात येत आहेत. तसेच मच्छीमार बांधवास दिनांक ९/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात आदिवासी विभागाच्या निवासी शाळेतील काही विद्यार्थिनींशी शिक्षकाने अश्लील वर्तन केल्याबाबत

**(२६) * ७९५४१ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात एका आदिवासी आश्रमशाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनीची प्रसूती झाल्याची घटना नुकतीच घडली असताना आदिवासी विकास विभागाच्या एका एकलव्य निवासी शाळेतील इयत्ता सातवीतील १५ ते २० विद्यार्थिनींशी तेथील शिक्षकाने अश्लील वर्तन केल्याची गंभीर घटना दिनांक १८ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थीनीना शिक्षण देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी आश्रमशाळा स्थापन झालेल्या असताना तेथे उक्त प्रकारच्या घटना घडत असल्यामुळे विद्यार्थिनीची सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधीत शिक्षकाला सेवेतून निलंबित करुन कारवाई करण्याबाबत तसेच विद्यार्थिनीच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) अंशत: खरे आहे.

(२) आश्रमशाळातील विद्यार्थीनीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आयुक्तालयाने दिनांक १५.०४.२०२४ रोजी सूचना निर्गमित केल्या असुन त्यांची अमंलबजावणी करण्यात येत आहे. आश्रमशाळामध्ये CCTV बसविण्यात आले

आहेत, प्रत्येक कार्यालयाच्या तसेच आश्रमशाळेच्या स्तरावर विशाखा समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थीनीच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्यात येते.
(३) सदर प्रकरणी संबंधित शिक्षकाला दिनांक १७.०१.२०२४ रोजी निलंबित करण्यात आलेले असून अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे स्तरावरुन विभागीय चौकशी सुरु आहे. त्या शिक्षकाविरुध्द सटाना पोलीस ठाण्यामध्ये दिनांक ०५.०२.२०२४ रोजी गुन्हा दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला व बुलढाणा जिल्ह्यात ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२७) * ७९९३४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम विदर्भातील अकोला व बुलढाणा या जिल्ह्यात ठिबक व तुषार सिंचनाकरिता प्रोत्साहन म्हणून देण्यात येणारे कोट्यवधी रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांना अद्याप मिळाले नसल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच बुलढाणा जिल्ह्यात सूक्ष्म सिंचनाचे सुमारे १५ हजार प्रस्ताव व अकोल्यात २३०० पेक्षा अधिकचे कोट्यवधी रुपयांचे प्रस्ताव निधीअभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही जिल्ह्यातील सूक्ष्म सिंचन साहित्य घेतलेल्या शेतकरी व वितरक यांना अनुदानाअभावी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन पश्चिम विदर्भातील अकोला व बुलढाणा या जिल्ह्यासह राज्यभरातील सर्वच जिल्ह्यातील तुषार/ठिबक सिंचनाचे कोट्यवधी रुपयाचे अनुदान शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी तसेच सदरहू प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) ते (४) पश्चिम विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील १७३०९ तर अकोला जिल्ह्यातील ३९५८ ठिबक व तुषार सिंचनाकरिताच्या प्रस्तावांचे रुपये ७१.१९ कोटी रकमेचे दायित्व माहे एप्रिल, २०२४ अखेर निर्माण झाले आहे, हे खरे आहे. तसेच त्यानंतर देखील पूर्वसंमती दिलेल्या शेतकऱ्यांनी संच बसवून अनुदान मागणी केलेली असल्याने दायित्व रकमेत वाढ होत आहे.

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषि विकास योजना-प्रती थेंब अधिक पिक (सूक्ष्म सिंचन) योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचनाकरिता अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५% तर इतर शेतकऱ्यांना (५ हेक्टरच्या मर्यादेत) ४५% अनुदान देण्यात येते. ही योजना केंद्र पुरस्कृत असून यामध्ये केंद्र व राज्य हिश्श्याच्या निधीचे प्रमाण ६०:४० असे आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून केंद्र हिश्श्याचा निधी प्राप्त झाल्यानंतरच राज्य हिश्श्याचा त्या समरूप निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

या व्यतिरिक्त केंद्र पुरस्कृत प्रती थेंब अधिक पिक (सूक्ष्म सिंचन) योजनेच्या लाभार्थ्यांना सूक्ष्म सिंचन घटकासाठी मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेमधून व अटल भूजल योजनेत समाविष्ट गावांमधील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५% तर इतर शेतकऱ्यांना (५ हेक्टरच्या मर्यादेत) ३०% पुरक अनुदान देण्यात येते.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रती थेंब अधिक पिक या घटकासाठी सन २०२३-२४ मध्ये मंजूर रुपये ५१० कोटी निधीपैकी फक्त रुपये १५४.१७ कोटी निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला होता. त्यामुळे दिनांक ३१ मार्च, २०२४ अखेर रुपये ६२७.४० कोटी रकमेचे दायित्व निर्माण झाले आहे. सन २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाकडून

पहिल्या हप्त्यापोटी रुपये ५२.६२ कोटी निधी प्राप्त झाला असून सदर निधी व त्या समरूप राज्य हिश्श्याचा निधी वितरित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानाअभावी शेतकऱ्यांचे अनुदान प्रलंबित असल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) तुंगारेश्वर अभयारण्य क्षेत्रातील बांधकामे व कारखान्यांमुळे वन्यजिवांची सुरक्षितता धोक्यात आल्याबाबत

**(२८) * ८०८११ श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने वन्यजीव अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानांच्या सभोवतालचे क्षेत्र ‘इको सेन्सेटीव्ह झोन’ जाहीर करण्याचे आदेश सन २०१९ मध्ये दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेशानुसार तुंगारेश्वर अभयारण्य परिसराचे क्षेत्र पर्यावरणाच्या दृष्टीने ‘संवेदनशील क्षेत्र’ म्हणून जाहीर केले असूनही या ठिकाणी अनधिकृत बांधकामे व कारखान्यांची दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संवेदनशील क्षेत्रातील बांधकामे व कारखान्यामुळे परिसरातील वन्यजीवांची सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर कारवाई करण्यासंदर्भात नागरिक अधिकारी समितीने दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.वने मंत्री, मा.पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य व तसेच प्रधान सचिव, वने यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल रिट याचिका (सिव्हील) क्रमांक ४६० / २००४ मध्ये पारित आदेशान्वये वन्यजीव अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानाभोवतीचे क्षेत्र पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करावयाचे आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या दिनांक ११.०९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्याभोवती पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. तथापि, एका हिंदी दैनिकात दिनांक ०५.०४.२०२४ रोजी “इको सेंसिटिव जोन में अवैध कारखानों से फैल रहा प्रदूषण” या शिर्षाखाली बातमी प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) दिनांक २३.०८.२०२३ रोजी तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समितीच्या बैठकीत पर्यावरण संवदेनशील क्षेत्रामध्ये अधिसूचनेतील तरतुदींचा भंग होत असल्यास संबंधित विभागाने प्रथमत: त्यांचे कायदे व नियमानुसार कार्यवाही करण्याचे व तद्नंतर आवश्यकतेनुसार पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत कार्यवाही प्रस्तावित करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत.

पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील वनक्षेत्रावर असलेले अतिक्रमण काढण्यासंदर्भात डहाणू वन विभागाकडून कार्यवाही करण्यात येत असून महसूल विभागाकडे हस्तांतरित केलेल्या क्षेत्रातील अतिक्रमण काढण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, पालघर यांना कळविण्यात आले आहे. तसेच सदर क्षेत्रात कार्यरत असलेल्या औद्योगिक आणि व्यावसायिक आस्थापनांची प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वर्गवारीनुसार तपासणी करून नियमानुसार कारवाई करण्याचे संबंधित यंत्रणेस सूचित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.